शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

श्री वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करणेबाबतचे मा. ना. विनोद तावडे, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण शासन यांचे जा.क्र. मंत्री/शा.शि.क्री.यु.क.,उ.तं.,म.भा.,सां. का.,अ.वि.व व., टिप्पणी क्र. ७२७/१९ दि. ०८/०२/२०१९ चे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडली आहेत.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 253
दि. 21 FEB 2019

जा.क्र. मंत्री/शा.शि.,क्री.यु.क.,उ.तं.,म.भा.,सां.का.,अ.वि.व व.,
टिप्पणी क्र. ६२६/१८ दिनांक :


विनोद तावडे
मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,
उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,
अल्पसंख्याक विकास व वक्फ
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक :- 8 FEB 2019

सप्रेम नमस्कार !

**आपणा सर्वांना मराठी भाषा गौरव दिनाच्या खूप शुभेच्छा!** ज्येष्ठ कवी व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन दि. २७ फेब्रुवारी, हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून, शासनाच्या वतीने विविधांगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी, आपण **'मराठी म्हणी'** या विषयाला प्राधान्य देण्याचे ठरविले आहे.

'मराठी म्हणी' या मध्यवर्ती कल्पनेच्या अनुषंगाने मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार होणे अपेक्षित आहे.

**चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे धन जपू या !!**
**चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे मन जपू या !!** .... असा संकल्प करून, आपण प्रामुख्याने मराठीतील म्हणींविषयक कार्यक्रम-उपक्रम आयोजित करावेत.

त्याचप्रमाणे, हे वर्ष **ग.दि.माडगुळकर व पु.ल.देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष** आहे, त्यामुळे कार्यक्रम-उपक्रमांमध्ये या प्रतिभावंतांच्या साहित्याचाही यथायोग्य विचार व्हावा.

मराठी भाषा गौरव दिनी, महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालये, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा यांचे संस्थाप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी या **सर्वांनी त्या-त्या ठिकाणच्या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा.** तसेच, **संगणकावर युनिकोड-मराठी सुरू करून, मला unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर टंकलिखित संदेशही पाठवावा**, असे आग्रही आवाहन मी करीत आहे. त्याचबरोबर आपण आपल्या संस्थेत यथायोग्य उपक्रमांचे आयोजन करावे. (सोबतच्या उपक्रम सूचीत तपशील दिला आहे.)

सर्व प्रमुखांनी आपल्या अधीनस्त असणाऱ्या सर्व संस्थांना याबाबत सूचना द्याव्यात व त्याचा अनुपालन अहवाल इ-टपालाद्वारे मला पाठवावा. प्राचीन भाषांपैकी एक असलेल्या आणि भारतातील अधिकृत भाषांपैकी एक असलेल्या आपल्या मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी आपण सकारात्मक प्रतिसाद द्याल,. याची खात्री आहेच. गेली २-३ वर्षे आपला सर्वांचा सहभाग आमचा उत्साह वाढवणारा होता, याही वर्षी मराठी भाषा गौरव दिन अधिक उत्साहाने साजरा करावा, हे आग्रही आवाहन !

**सहपत्र — उपक्रमांची सूची.**

आपला,

विनोद तावडे

(विनोद तावडे)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

कुसुमाग्रज जयंती

२७ फेब्रुवारी

# मराठी भाषा गौरव दिन

# दि. २७ फेब्रुवारी, २०१९ : मराठी भाषा गौरव दिन – उपक्रम सूची

1. या वर्षीच्या मराठी भाषा गौरव दिनाची मध्यवर्ती कल्पना- '**मराठी म्हणी**' -

   **चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे 'धन' जपू या !!**
   **चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे 'मन' जपू या !!**

   ...मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपक्रमांचे आयोजन. जसे, म्हणी स्पर्धा, भित्तिचित्रे, सोशल मीडियावर प्रचार, म्हणींची पुस्तके, म्हणीकोश, भाषणे, चर्चासत्रे, परिसंवाद, इ.

2. पु. ल. देशपांडे व ग. दि. माडगुळकर यांच्या **जन्मशताब्दी वर्षानिमित्त** शाळा व महाविद्यालयांमध्ये पु. ल. देशपांडे यांच्या पुस्तकांतील उताऱ्यांचे आणि ग. दि. माडगुळकर यांच्या कवितांचे वाचन.
3. पुलंच्या साहित्यावर आधारित स्टॅण्डअप कॉमेडी शो / नाट्यस्पर्धा / प्रहसन स्पर्धा / प्रहसन सादरीकरणे.

4. **कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.**

5. **'मोबाईलवर मराठी'** - बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) मुक्त पच्या माध्यमातून मोबाईलवर मराठीतून टंकलेखन करण्यास सुरुवात करा. तसेच, फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त पच्या माध्यमातून मोबाईलवर मराठीतून टंकलेखन करा.

6. **'संगणकावर मराठी' -** संगणकावर युनिकोड-मराठी सुरु करा. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्रानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.

7. युनिकोडप्रणित मराठी आणि **इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक** संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

8. **मराठी भाषेसंबंधित** विषयांवर **व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे.** तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळयांचे आयोजन.

9. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा **मराठी भाषेचा वापर** याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

10. **मातृभाषेची महती आणि माहिती,** तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर **विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.**
11. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.

12. सन २०१८ – १९ हे वर्ष **राम गणेश गडकरी** यांचे **स्मृतिशताब्दी वर्ष** असल्याने, त्यांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करावे.

13. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

14. मराठीतील कोश वाङ्:मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश कसे वाचावेत, याबाबत प्रशिक्षण.

15. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

16. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

17. म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती – या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे.

18. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.

19. मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

20. मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन.

21. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

22. इयत्ता १० वी व इ.१२ वी च्या परीक्षेत **मराठी विषयात सर्वाधिक गुण** मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार. तसेच मराठी विषयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

23. **पुस्तकांचं गाव - भिलार** (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) या महाराष्ट्र शासनाच्या अभिनव प्रकल्पाविषयी माहिती देणे. तसेच पुस्तकांच्या गावास भेट देणे.

---

**टीप :**

- आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर किंवा पत्रात नमुद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.
- अहवाल इ-पत्त्यावर पाठवताना युनिकोड प्रणित मराठी टंकांचा वापर अवश्य करावा.
- छायाचित्रे जोडताना ती निवडकच जोडवीत तसेच ती जेपीजी/जेपीइजी स्वरुपात धारिकेस विद्यालय / महाविद्यालय / संस्था यांचे नाव देऊन पाठवावीत.

# दि. २७ फेब्रुवारी, २०१९ : मराठी भाषा गौरव दिन — उपक्रम सूची

१. या वर्षीच्या मराठी भाषा गौरव दिनाची मध्यवर्ती कल्पना- **'मराठी म्हणी'** -

**चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे 'धन' जपू या !!**
**चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे 'मन' जपू या !!**

...मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपक्रमांचे आयोजन. जसे, म्हणी स्पर्धा, भित्तिचित्रे, सोशल मीडियावर प्रचार, म्हणींची पुस्तके, म्हणीकोश, भाषणे, चर्चासत्रे, परिसंवाद, इ.

२. पु. ल. देशपांडे व ग. दि. माडगुळकर यांच्या **जन्मशताब्दी वर्षानिमित्त** शाळा व महाविद्यालयांमध्ये पु. ल. देशपांडे यांच्या पुस्तकांतील उताऱ्यांचे आणि ग. दि. माडगुळकर यांच्या कवितांचे वाचन.

३. पुलंच्या साहित्यावर आधारित स्टॅण्डअप कॉमेडी शो / नाट्यस्पर्धा / प्रहसन स्पर्धा / प्रहसन सादरीकरणे.

**४. कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.**

५. **'मोबाईलवर मराठी'** - बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) मुक्त ॲपच्या माध्यमातून मोबाईलवर मराठीतून टंकलेखन करण्यास सुरुवात करा. तसेच, फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त ॲपच्या माध्यमातून मोबाईलवर मराठीतून टंकलेखन करा.

६. **'संगणकावर मराठी'** - संगणकावर युनिकोड-मराठी सुरु करा. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्रानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.

७. युनिकोडप्रणित मराठी आणि **इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक** संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

८. **मराठी भाषेसंबंधित** विषयांवर **व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे.** तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

९. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा **मराठी भाषेचा वापर** याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

१०. **मातृभाषेची महती आणि माहिती,** तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर **विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.**

११. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.

१२. सन २०१८ — १९ हे वर्ष **राम गणेश गडकरी** यांचे **स्मृतिशताब्दी वर्ष** असल्याने, त्यांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करावे.

१३. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

१४.मराठीतील कोश वाङ्:मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश कसे वाचावेत, याबाबत प्रशिक्षण.

१५. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

१६. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

१७.म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती — या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे.

१८. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.

१९. मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

२०. मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन.

२१. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

२२.इयत्ता १० वी व इ.१२ वी च्या परीक्षेत **मराठी विषयात सर्वाधिक गुण** मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार. तसेच मराठी विषयातं पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

२३.**पुस्तकांचं गाव - भिलार** (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) या महाराष्ट्र शासनाच्या अभिनव प्रकल्पाविषयी माहिती देणे. तसेच पुस्तकांच्या गावास भेट देणे.

---

**टीप :**

- आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर किंवा पत्रात नमुद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.
- अहवाल इ-पत्त्यावर पाठवताना युनिकोड प्रणित मराठी टंकांचा वापर अवश्य करावा.
- छायाचित्रे जोडताना ती निवडकच जोडवीत तसेच ती जेपीजी/जेपीइजी स्वरुपात धारिकेस विद्यालय / महाविद्यालय / संस्था यांचे नाव देऊन पाठवावीत.